**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**जनसंपर्क विभाग**

---

## सर्व समस्यांवर परिणामकारक तोडगा काढणारे अभियंता व्हा - कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे

## विद्यापीठाच्या संगणकशास्त्र विभागात अभियंता दिन साजरा

अमरावती –

अभियांत्रिकी म्हणजेच उद्‌भवलेल्या समस्यांवर उपलब्ध असलेल्या संसाधनांच्या सहाय्याने शोधलेला मार्ग आणि यासाठीच अभियंते अतिशय निपुण असतात, म्हणून विद्यार्थ्यांनी कुठल्याही समस्यांवर परिणामकारक तोडगा काढणारे अभियंता व्हावे, असे आवाहनात्मक प्रतिपादन कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संगणकशास्त्र विभाग, उपयोजित परमाणू विभाग आणि रासायनिक तंत्रशास्त्र विभाग यांचे संयुक्त विद्यमाने अभियंता दिन साजरा करण्यात आला, त्याप्रसंगी अध्यक्षस्थानावरुन कुलगुरू बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून बी.एस.एन.एल. अमरावतीचे जनरल मॅनेजर श्री उज्वल गुल्हाने, संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ. विलास ठाकरे, उपयोजित परमाणूशास्त्र विभागप्रमुख डॉ. संजय डुडूल, रासायनिक तंत्रशास्त्र विभागप्रमुख डॉ. अनिल नाईक उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे पुढे म्हणाले, भारतीय शिक्षण व्यवस्थेतून बाहेर पडणारे सर्व अभियंते सर्वोत्तम असून अमेरिका, इंग्लंड सहित सर्व प्रगत राष्ट्रांमध्ये भारतीय अभियंते मोठ्या प्रमाणावर कार्यरत आहेत. प्रचलित शिक्षण पद्धतीमध्ये शिक्षकांनी जर विद्यार्थ्यांसमोर विविध समस्या मांडल्या, तर विद्यार्थी त्यांच्याजवळ असलेल्या प्रचंड कल्पनाशक्तीने परिणामकारक उपाययोजना सूचवू शकतात. आजच्या विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानापेक्षा उपयोजित शिक्षणपद्धतीमध्ये जास्त रस असून त्यासाठी शिक्षणामध्ये प्रोजेक्ट बेस्ट लर्निंग आणि एक्सपिरीयन्स लर्निंग या पद्धतीचा अवलंब करणे काळाची गरज असल्याचेही ते म्हणाले. कुलगुरूंनी संगणकशास्त्र सोसायटीतर्फे घेण्यात आलेल्या विविध सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट स्पर्धा तसेच इतर कार्यक्रमांचे कौतुक करुन अशा प्रकारच्या स्पर्धातूनच स्टार्टअप उदयास येतील, असा विश्वास याप्रसंगी व्यक्त केला.

प्रमुख अतिथी श्री उज्वल गुल्हाने यांनी अभियांत्रिकी क्षेत्राचे विशेषतः माहिती आणि तंत्रज्ञानाचे कोरोना काळातील योगदान व महत्व विशद केले. ते पुढे म्हणाले, एक उत्कृष्ट अभियंता त्यांच्यासमोर आलेल्या कुठल्याही समस्येवर योग्य उपाय हमखास शोधतो व त्यावर मात करतो. श्री गुल्हाने यांनी विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी आणि विशेषतः दूरसंचार क्षेत्रातील विविध संधीबद्दल मार्गदर्शन याप्रसंगी केले. संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ. विलास ठाकरे यांनी भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या कर्तुत्वाबद्दल विद्यार्थ्यांना अवगत करुन भारताने अभियांत्रिकी क्षेत्रात केलेल्या प्रगतीबद्दल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकतेतून संगणकशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. स्वाती शेरेकर यांनी संगणकशास्त्र सोसायटीमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संगणकशास्त्र सोसायटीच्या अध्यक्ष कु. वैष्णवी देशमुख, उपाध्यक्ष चेतन आवारे, सचिव कार्तिक डाबरे तसेच इतर पदाधिकारी व विभागातील विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतलेत.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. ०४/१०/२०२०.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी